# ४. वाहनाचा थकित कर कसा भरावा




नवीन दुचाकी वाहनाकरिता व जुन्या दुचाकी वाहनाकरिता राज्यामध्ये १९८७ पासून एकरकमी करयोजना अंमलात आली असल्यामुळे बहुतांशी वाहनधारकांनी थकित कर भरलेला आहे व नवीन वाहन धारकांना हा कर भरणे बंधनकारक आहे. सध्या ज्या वाहनाचा अद्यापही कर भरणा केला नसेल अशा वाहनधारकांनी प्रादेशिक परिवहन कार्यालय किंवा उप प्रादेशिक परिवहन कार्यालय यांना समक्ष भेटून आपला जुना वाहन क्रमांक देऊन त्यावरील कर व व्याज याची माहिती त्वरित देण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. वाहनधारकांनी "एटी" फॉर्म भरुन वाहनधारकाला थकित असलेला कर भरता येईल. नवीन दुचाकी वाहनाकरिता वाहनाच्या किंमतीच्या ७ टक्के कर भरावा लागतो.

चार चाकी खाजगी संवर्गात मोडणा-या कार, जीप्स, व इतर खाजगी वापरात असलेल्या वाहनांना १.१०.१९९६ पासून एकरकमी कर भरणे हे बंधनकारक

करण्यात आलेले आहे. १.१०.१९९६ पूर्वी नोंदणी झालेली सर्व खाजगी संवर्गातील वाहनधारकांनी एकरकमी कर भरणे बंधनकारक आहे. ज्या वाहनधारकांनी अद्यापि कर भरला नसेल अशा वाहनधारकांनी कराधान अधिका-यांना समक्ष भेटून होणारा कर व त्यावरील व्याज याची माहिती करुन " एटी " फॉर्म भरुन कर भरता येईल. नवीन खाजगी चारचाकी वाहनांकरिता सध्याच्या तरतुदीनुसार वाहनाच्या किमंतीच्या ३.५ टक्के कर आकारणी केली जाते.

ट्रक, बस, ऑटोरिक्षा, टॅक्सी यांच्याकरिता वार्षिक कराची आकारणी केली जाते. वाहन वापरण्यापूर्वी वाहन धारकांना आगाऊ तिमाही किंवा वार्षिक कर भरणा करणे आवश्यक आहे. परिवहन वर्गातील हलके मोटार वाहन म्हणजे टॅम्पो सदृश वाहनांसाठी शासनाने १.४.२००० पासून वार्षिक कराच्या ७ पट दराने एकरकमी कराचा भरणा करणे अनिवार्य केले आहे. तर इतर मालवाहु वाहनांना स्वेच्छेने उपरोक्त दराने एकरकमी कराचा भरणा करण्याचा विकल्प देण्यात आलेला आहे. ज्या वाहनधारकांनी आपल्या वाहनाचा कर भरला नसेल अशांनी कराधान अधिका-यांना भेटून थकित असलेला कर व व्याज याची आकारणी करुन " एटी " फॉर्म भरुन कराचा भरणा करता येईल.

## वाहनाच्या कराबाबत

रितसर अर्ज व विधीग्राह्य कागदपत्रे

खाजगी वाहन

दुचाकी खाजगी वाहन–एक रकमी कर

रोखपाल/वरिष्ठ लिपिक

चार चाकी खाजगी वाहन-एक रकमी कर

रोखपाल/वरिष्ठ लिपिक

सार्वजनिक जडवाहन

तिमाही किंवा वार्षिक कर

रोखपाल/वरिष्ठ लिपिक

हलके मोटार वाहन-एक रकमी कर

रोखपाल/वरिष्ठ लिपिक

थकीत भरलेल्या करासाठी व्याजमाफीचा अर्ज परिवहन आयुक्त कार्यालयाकडे करु शकतात.

---

## वाहनाचा ना-वापर

आगाऊ ना-वापर रितसर अर्ज - विधीग्राह्य कागदपत्रे

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी/ प्रादेशिक परिवहन अधिकारी

उशीरा वाहनाचा ना-वापर रितसर अर्ज व विधीग्राह्य कागदपत्रे

परिवहन आयुक्त कार्यालय